**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

दूरध्वनी क्र. ०२२ २२०१७१०६
Email ID :- sopr4.rdd-mh@nic.in

बांधकाम भवन, मर्झबान पथ,फोर्ट,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.

---

क्रमांक : व्हीपीएम २०२३/प्र.क्र. १७९/पंरा-४ दिनांक:- ७ नोव्हेंबर २०२३

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व

विषय -: राज्यातील ग्रामपंचायतीवर सौरऊर्जा संयंत्र स्थापित करण्याबाबत

संदर्भ-: १) सन २०२३- २४ च्या अर्थसंकल्पीय भाषणात केलेल्या घोषणेतील मुद्दा क्र१३६.

२)उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा.नि. क्र. अपाऊ- २०२०/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७ दि.३१ डिसेंबर २०२०

महोदय/महोदया,

मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणात (मुद्दा क्र.१३६ ) राज्यातील ग्रामपंचायतीचे पारंपारिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी २०००० ग्रामपंचायतीत सौर उर्जा प्रकल्प उभारण्यात येतील अशी घोषणा केली आहे. यासंदर्भात अपारंपारिक उर्जा धोरण दि.३१.१२.२०२० चे अवलोकन व्हावे.

२. सबब, राज्यातील ग्रामपंचायतीत सौरऊर्जा प्रकल्प उभारणी करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीने ठराव घेऊन ग्रामपंचायतीत सौरऊर्जा सयंत्र स्थापित करण्यात यावेत. सदर योजनेसाठी केंद्र शासनाचे अनुदान, घरपट्टी (स्वनिधी), १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणारा निधी, जिल्हा विकास निधी, विशेष घटक योजना, ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रम या स्त्रोतांमधून निधी उपलब्ध करून संबंधित ग्रामपंचायतीत सौरऊर्जा संयंत्र स्थापित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

आपली,

(व.मुं.भरोसे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) प्रधान सचिव(उर्जा-७) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
४) निवड नस्ती (पंरा-४)